# आर सी एफ शेती पत्रिका

कृषी समृद्धीची मार्गदर्शिका

शेतकऱ्यांच्या प्रथम पसंतीचे मासिक

समृद्धीची एकत्र वाटचाल

वर्ष ११   अंक – ८   मुंबई   फेब्रुवारी २०२०   पाने – २४   किंमत ₹ ५/–






# संपादकीय




जागतिकस्तरावर सर्वाधिक लोकसंख्याक होऊ घातलेल्या व युवकांचा देश म्हणून उदयास आलेल्या आपल्या भारत देशात आजही शेतीप्रधान संस्कृतीचा पुरस्कार केला जातो. अन्नधान्यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी कृषिप्रधान देश हे आपले बलस्थान आहे. वाढत्या लोकसंख्येला दोन वेळचे सकस आणि आरोग्यदायी अन्न पुरविणे हे प्रगतिपथावर असलेल्या कृषिव्यवस्थेमुळेच शक्य होत आहे. पण सध्याच्या जागतिक हवामान बदलाच्या कालखंडात शेती व्यवसायाला अनेकानेक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. कीड आणि रोगांची वाढती प्रतिकारता आणि घटते पीक उत्पादन या प्रमुख समस्या आहेत. शेती व्यवसायात उतरताना जमीन म्हणजे मातीविषयाचा अभ्यास आवश्यक असतो. यामध्ये जमिनीची भौगोलिक, जैविक स्थिती तसेच सेंद्रिय कर्ब व रासायनिक अन्नघटकांची उपलब्धता या बाबींना खूप महत्त्व असते. पीकाची वाढ आणि अधिक उत्पादन यासाठी गरजेनुसार शिफारशीप्रमाणे रासायनिक निविष्ठांचा वापर हानीकारक ठरत नसतो. उत्पादनवाढीच्या दृष्टिने संतुलित खतवापर करण्याबाबत कृषी विद्यापीठांच्या संशोधन विभागातर्फेसुद्धा शिफारशी देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये सेंद्रिय व रासायनिक खतांच्या वापराबाबत मार्गदर्शन केलेले असते.

आपल्या देशातील कृषिव्यवसायिक यामध्ये प्रामुख्याने ज्यांचा उल्लेख करावा, तो म्हणजे युवावर्ग या क्षेत्रात आव्हानात्मक वातावरणात रात्रंदिवस कष्ट करत आहे. नवनवीन कृषितंत्रज्ञानाचा अवलंब करून देशाला अन्नसुरक्षा प्रदान करण्यासाठी हातभार लावत आहे. आधुनिक कृषिज्ञान निर्मितीमध्ये कृषिधोरण निर्माते, कृषिशास्त्रज्ञ आणि विस्तार कर्मचारी यांचेही योगदान दुर्लक्षित करून चालणार नाही. ज्ञानाशिवाय प्रगती नाही ही बाब आता सर्वांच्या लक्षात आलेली आहे. केवळ वाढीव उत्पादनच नव्हे तर त्याच बरोबर अन्नधान्याची पौष्टिकता, टिकावुपणा तसेच ग्राहकांची क्रयशक्ती वाढविण्यावर सुद्धा भर देण्याची गरज आहे. ग्रामीण युवा, महिलावर्गालासुद्धा शेती आणि शेतीपूरक व्यवसाय, उपलब्ध संसाधनांवर आधारित कुटीर उद्योगांच्या माध्यमातून आर्थिक समृद्धीकडे अग्रेसर व्हायला हवे.

आरसीएफ शेती पत्रिका मासिकाच्या मागील महिन्यातील परदेशी भाजीपाला विशेषांकाला राज्यातील युवावर्गाकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार तसेच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आरसीएफ तर्फे सन्मानित करण्यात आलेल्या शेतकरी बंधु भगिनीं यांना कृषी विकासाच्या वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

धन्यवाद.



(एन.एच. कुरणे)
कार्यकारी संचालक (विपणन)




संवाद

## यशाचा मुलमंत्र

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे, असं मानसशास्त्रज्ञ सांगतात. कुणाशी तरी बोलावं, विचार सांगावेत ही आंतरीक गरज प्रत्येक मानवी जीवामध्ये असते. अपेक्षित माहिती ऐकणाऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी बोलणाऱ्या व्यक्तीजवळ संवाद कौशल्याची जरूरी असते. त्याच्या जवळ ही कला नसेल तर अपेक्षित असलेली माहिती ऐकणारा ऐकतो, पण त्याचा योग्य अर्थ त्याच्यापर्यंत पोहोचेलच असं नाही. संवाद कौशल्य जन्मजात नसतं, अनुवंशिकरीत्याही मिळत नसतं. हे शिक्षकांचे मार्गदर्शन, संबंधित व्यक्तीचे वाचन, भाषेवरील प्रभुत्व, आत्मविश्वास, सभोवतालची परिस्थिती व सहसंवेदना या जीवनकौशल्यांचे एकत्रित योगदान असते!

# अंतरंग


३ देशी कोंबडी पालन
८ कारले : आरोग्यासाठी हितकारक
१० टोमॅटो : रोग व कीड नियंत्रण
११ सुर्यफूलातील रोगांचे नियंत्रण
१२-१३ जपणूक आमची सामाजिक बांधीलकीची...
१४ पौराणिक फुलांची माहिती व ओळख
१६ सुरण लागवड तंत्रज्ञान
१८ आधुनिक पद्धतीने विलायती भाजीपाला व फळ उत्पादन
२१ विचार मंथन



समृध्दीची एकत्र वाटचाल

संपादक : नुहू हसन कुरणे

Editor : Nuhu Hasan Kurane

संपादकीय समन्वयन – मिलिंद आंगणे

Editorial Co-ordination - Milind Angane

(022-25523022)



• सल्लागार समिती • • Advisory Committee •

श्री. नरेंद्र कुमार Mr. Narendra Kumar

श्री. गणेश वरगंटीवार Mr. Ganesh Wargantiwar

श्री. माल्कम क्रियाडो Mr. Malcolm Creado

सौ. निकीता पाठारे Mrs. Nikita Pathare

श्री. लिलाधर महाजन Mr. Liladhar Mahajan



शेती पत्रिका आता पुढील संकेत स्थळावर उपलब्ध.

www.rcfltd.com


## देशी कोंबडी पालन


डॉ. गोपाल मंजुळकर, विषय तज्ञ – पशु विज्ञान, कृषी विज्ञान केंद्र अकोला, मो. ९८२२२३१९२३


शेतकऱ्यांचे घर म्हटले की पशुसंगोपन आलेच! मुख्य करून गाई, म्हशी, शेळ्या अणि कुक्कुटपालन हे घरोघरी सांभाळून त्यातून शेतीला पूरक अर्थार्जन मिळत असते. यापैकी कुक्कुटपालन हा अतिशय सहज, कमी खर्चात, कमी जागेत आणि कमी कष्टात करण्यासारखा व्यवसाय आहे. त्यातल्या त्यात, ब्रॉयलरपेक्षा गावरान कोंबडीपालन किंवा परसातील कुक्कुटपालनामध्ये पशुपालक छोट्या शेतकऱ्यांना जास्त वाव आहे. कारण नियमित उत्पन्न देणारा गावरान अंडी उत्पादन हा उपव्यवसाय किंवा जोडधंदा बऱ्याच शेतकऱ्यांचे कुटुंब पोसत आहे.

पशुपालकांसाठी चांगली संधी असलेला आणि बऱ्याच मोठ्या प्रमाणावर रूढ झालेला शेतीला पूरक असा उद्योग म्हणजे कुक्कुटपालन किंवा कोंबडी पालन! शेळीपालन व्यवसायाप्रमाणेच कोंबडीपालनाचा व्यवसाय सुद्धा कोंबड्या मोकळ्या सोडून किंवा पिंजऱ्यात बंद करून अशा दोन्ही पद्धतीने करता येतो. मोकळ्या कोंबड्या साधारणपणे देशी वाणाच्या किंवा गावरान असतात.

विदेशी कोंबड्या मोकळ्या सोडल्यास मांजरासारखे प्राणी किंवा घार, गिधाड असे पक्षी यापासून त्यांना धोका असतो. परंतु गावरान कोंबड्यांमध्ये त्यांच्यापासून स्वत:चे संरक्षण करण्याची क्षमता असते. त्यामुळे या कोंबड्या मोकाट सोडल्या तरी चालतात. कोंबडीपालनामध्ये नवीन जातींच्या कोंबड्या मात्र मोकाटपणे पाळता येत नाहीत. त्यांच्यासाठी पिंजरा तयार करावा


Follow : rcfkisanmanch on

facebook twitter instagram

लागतो. कारण या कोंबड्यांमध्ये स्वत:चे संरक्षण करण्याची क्षमता नसते.

घरच्या परसामध्ये किंवा अंगणात, घराच्या आसपास गावरान दहा-वीस कोंबड्या पाळल्या की त्या स्वत:चे अन्न स्वत: शोधून खातात. दहा माद्यांमागे एखादा कोंबडा असला की, त्यांची पैदास वाढत राहते. या कोंबड्यांची फारशी निगराणी करावी लागत नाही. औषध उपचार कमी लागतो कारण त्यांची रोग प्रतिकारशक्ती चांगली असते तसेच खाद्य व पाणी सुद्धा कमी लागते. गावरान कोंबड्या पाळण्यासाठी जास्त खर्च करावा लागत नाही. अंड्या बरोबरच अंड्यातून पिल्ले सुद्धा घेता येतात त्यामुळे त्यांची संख्या वाढत जाते व वेळोवेळी पिल्ले सुद्धा विकत आणावी लागत नाहीत.

पिंजऱ्यातल्या कोंबड्यांच्या बाबतीत मात्र कोंबड्यांची एक पिढी संपली की, नव्याने छोटी छोटी पिल्ले विकत आणावी लागतात. गावरान कोंबड्यांचे पालन किफायतशीर असले तरी कोंबड्यांची संख्या ३० ते ४० असेपर्यंत मोकाट कोंबडी पालन करता येते. मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करायचा झाल्यास मोकाट कोंबडी पालन शक्य होत नाही. संध्याकाळी विश्रांतीसाठी कोंबड्यांना सुरक्षित जागा हवी. मांजर, कोल्हा, कुत्रा, सरपटणारे प्राणी वगैरेसारख्या शत्रुंपासून त्यांचे संरक्षण होणे आवश्यक असते, त्यासाठी अंगणातच एका बाजूला लाकडी खोके करावेत. जे जमिनीपासून किमान फुटभर तरी उंचीवर असावेत, म्हणजे सरपटणारे प्राणी आत शिरकाव करु शकणार नाहीत. शिवाय ओलसर जमिनीचा त्रास होणार नाही. हे खोके जमिनीशी घट्ट सांधून घ्यावेत, जेणे करुन चोरांना उचलून नेता येऊ नयेत. कोंबड्यांना नीट बसता येईल असे एक ते तीन खोक्यात कप्पे करावेत. रोज संध्याकाळी कोंबड्या बसण्यापूर्वी प्रत्येक कप्प्यात राख टाकावी, म्हणजे रात्रभरातील विष्ठेचा ओलसरपणा राखेत शोषला जाईल. रोज सकाळी विष्ठेसह राख झाडून घेता येईल त्यामुळे दुर्गंधी येणार नाही. साधारणत: पंधरवड्यातून सायपरमेथ्रीन/ॲमीट्राझ हे किटकनाशक अल्प प्रमाणात घेऊन खोक्यातून किंवा बाहेरून फवारल्यामुळे त्यांना पिसवा, उवा यांचा त्रास होणार नाही. रक्त शोषणाऱ्या किटकांमुळे कोंबड्या अशक्त होतात, परिणामी अंडी कमी देतात तसेच त्यांची रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. खोक्याच्या छपरावर पत्रा असल्यास पावसापासून कोंबड्यांचे संरक्षण होईल. कोंबड्यांची विष्ठा खड्ड्यात साठविल्यास उत्तम प्रतिचे खत तयार करता येते.

**अंडी उत्पादनासाठी विविध जाती :** आज कमी कालावधी मध्ये तयार होणाऱ्या क्रॉस ब्रीड्स उपलब्ध आहेत त्यापैकी -

**व्हाईट लेग हॉर्न :** सरासरी अंडी उत्पादन वर्षाला २००-२५०. **ब्राऊन लेग हॉर्न :** सरासरी वर्षाला २८०-३०० अंडी देतात. **ऱ्होड आइलँड रेड:** वजन वाढ संथ गतीने होते. सहा महिन्यानंतर अंडी उत्पादन सुरु होते. एका चक्रात २२० ते २५० अंडी उत्पादन. **ब्लॅक अस्ट्रॉलॉर्प :** तीन महिन्यात दोन किलो पर्यंत वाढ अणि एका चक्रात १६० ते २०० अंडी उत्पादन.

जेव्हा आपण फक्त गावरान अंडी उत्पादनाचा विचार करतो तेव्हा काही विशिष्ठ जाती आपल्या डोळ्यांसमोर येतात त्यापैकी -

◆ **देशी पक्षी :** यामध्ये वर्षाकाठी १५० अंडी मिळतात व या जातीच्या कोंबड्यांच्या मांसाला चांगली मागणी असते.

**सुधारीत जाती :** ◆ **ग्रामप्रिया :** दोन महिन्यात एक किलो वजन वाढ आणि एका अंडी चक्रात १८० ते २०० अंडी उत्पादन.

◆ **गिरिराज :** दोन महिन्यात एक किलो वजन वाढ आणि एका अंडी चक्रात १५० अंडी उत्पादन.

◆ **वनराज :** दोन महिन्यात एक किलो वजन वाढ आणि एका अंडी चक्रात १२० ते १६० अंडी उत्पादन मिळते.

◆ **कडकनाथ :** पाच महिन्यात एक किलो वाढ आणि एका अंडी चक्रात ६० ते ८० अंडी उत्पादन मिळते.

**दैनंदिन व्यवस्थापन :** हॅचरी मधून एक दिवसाची १०० पिल्ले प्रती बॉक्स अशा स्वरूपात पॅक करुन दिली जातात. पिल्ले सुदृढ, निरोगी आणि चपळ असावीत. तसेच त्यांना पहिल्या दिवशी मॅरेक्स ही लस दिल्याची खात्री करावी. पिल्ले प्रवासातून फार्मवर आणत असताना अलगद, जास्त हेलकावे न देता आणावीत. फार्मवर पिल्ले पोहोचताच बॉक्स उघडून पिल्लांची मरतुक झाली आहे का ते पहावे. मेलेली पिल्ले वेगळी काढावीत. साधारण एक लिटर उकळून थंड केलेल्या पाण्यात १०० ग्रॅम गुळ किंवा इलेक्ट्रॉल पाउडर मिसळून घ्यावी. नंतर प्रत्येक पिल्लाची चोच दोन ते तीन वेळा या पाण्यात बुडवून त्यास पाणी पिण्यास शिकवावे आणि पिल्ले नियंत्रित तापमान तयार केलेल्या ब्रूडर मधे सोडावीत. पहिले काही तास गुळ पाणी पिणे खुप महत्वाचे आहे कारण गुळ पाण्यामुळे पिल्लांच्या आतड्यात असणारा चिकट पदार्थ बाहेर येऊन पोट वाहण्यास मदत होते. असे न झाल्यास विष्ठेची जागा तुंबुन मरतुक होऊ शकते.

साधारण चार तासांनंतर मक्याचा भरडा किंवा तांदळाची कणी खाऊ घालावी. दुसऱ्या दिवशी 'चिक स्टार्टर' हे खाद्य सुरू करावे. साधारण पहिले २१ दिवस ब्रूडिंग करावे त्या नंतर पिल्लांच्या अंगावर पिसे तयार होऊ लागताच ते स्वतःच तापमान स्वतः नियंत्रित करू शकतात. या पुढे काही दिवस पिल्ले शेड मधे ठेवावीत आणि नंतर कंपाउंड मधे मोकळी सोडावीत. एक महिना पूर्ण होताच पिल्लाना 'चिक फिनिशर' हे खाद्य सुरु करावे.

**ब्रूडिंग (ऊब देणे) :** जेव्हा आपण मशीनच्या मदतीने पिल्ले जन्माला घालतो किंवा विकत घेतो तेव्हा त्यांच्या सोबत त्यांची आई नसते. म्हणून त्याना कृत्रिम उष्णता द्यावी लागते, ज्याला शास्त्रीय भाषेत 'ब्रूडिंग' करणे असे म्हणतात. एक दिवसाच्या पिल्लाच्या अंगावर पीसे नसतात ती स्वतःचे तापमान नियंत्रित करू शकत नाहीत. यासाठी त्यांना कृत्रिम उष्णता ब्रुडर मधून द्यावी लागते. या मध्ये पक्षी अत्यंत नाजुकरित्या हाताळावा लागतो.

**ब्रुडिंग करताना घ्यावयाची काळजी :** ह्या अवस्थेत मरतुक होण्याची संभावना जास्त असते, त्यामुळे पुरेशी काळजी घेणे फार महत्वाचे असते. ब्रूडरचे तापमान योग्य ठेवावे तसेच योग्य प्रमाणात प्रतिजैविक आणि जीवनसत्वे द्यावीत. १८ ते १९% प्रोटीन युक्त आहार ज्याला 'स्टार्टर' म्हणतात तो द्यावा. २१ दिवस पूर्ण होताच पिल्ले ब्रूडर मधून काढून 'हार्डनिंगसाठी' सोडावीत. जास्त प्रमाणात गावरान पक्षी पालन करावयाचे असल्यास खालील पद्धतींचा अवलंब करावा.

**वाढीचा कालावधी (चार ते पाच महीने) :** वाढीच्या कालावधीत पक्ष्यांची काळजी घ्यावयाची असते. या अवस्थेत नर आणि मादी पक्षी वेगळे करावेत आणि अनावश्यक नर विकुन टाकावेत किंवा मांस उत्पादनाच्या दृष्टीने स्वतंत्र वाढवावेत. या काळात योग्य शारीरिक वाढ अत्यंत महत्वाची असते. त्यांना मुक्त संचार उपलब्ध करावा व 'ग्रोवर फीड' खाऊ घालावे. ज्यात १५ ते १६% प्रोटीन असेल. याबरोबरच योग्य प्रमाणात खनिज मिश्रण तसेच जीवनसत्वांचा आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठासुद्धा अपेक्षित आहे.

कोंबड्यांना लासोटा बूस्टर, फौलपॉक्स बूस्टर या लसी द्याव्यात. अंडी उत्पादनासाठी पक्षी ठेवणार असाल, तर दर महिन्याला बूस्टर डोस द्यावेत. अंडी देण्याची अवस्था (सहा ते १८ महीने) वयाच्या २४ आठवड्यानंतर पक्षी अंडी देण्यास सुरुवात करतात. या काळात पक्षांना १८ ते १९% प्रोटीन युक्त आहार ज्याला 'लेयींग मेश' म्हणतात तो द्यावा. त्यासोबत ५% कॅल्शियम स्त्रोत द्यावा. अंडी घालण्यासाठी नेस्ट बॉक्स पुरवावेत प्रती ५ कोंबडी साठी एक नेस्ट बॉक्स या प्रमाणात असावा. साधारण वयाच्या ७२ आठवड्यांपर्यंत उत्पादन घ्यावे.

**पिसे गाळण्याची अवस्था (Moulting):** अंडी दिल्यानंतर पक्षी 'मौल्टिंग' अवस्थेत जातात, ज्यामधे पक्षी आपले पीसे गाळतात आणि त्याजागी नवीन पीसे उगवतात. शक्यतो या अवस्थेत पक्षी विकावेत. या टप्प्यानंतर उच्च अंडी उत्पादन मिळत नाही.

**गावरान कोंबड्यांना खाद्य :** गावठी कोंबडी दिवसभर फिरून स्वत:चे खाद्य शोधते. मोकळ्या पटांगणात कोंबड्यांना पुरेसे धान्यकण किंवा किटक मिळणे कठीणच. शिवाय इतर पशुपक्षीही अशा खाद्यांच्या शोधात असतातच, तेव्हा पाळीव कोंबड्यांना दिवसभराच्या भटकंतीत पोटभर खाद्य मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे. परिणामी अंडी निर्मिती पुरेसी होत नाही. यासाठी अंगणातील कोंबड्यांना पोटभर खाद्य मिळेल अशी सोय करणे गरजेचे आहे.

कोंबडीच्या अंडी निर्मितीसाठी प्रथिने मिळणाऱ्या खाद्याची आवश्यकता असते. यासाठी मका, ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ वगैरे सारखी एकदलीय धान्ये त्यांना पोषक ठरतात आणि पक्ष्यांना आवडतातही. दिवसातून एक ते दोन वेळा तरी असे मूठभर धान्य त्यांच्यापुढे अंगणात टाकणे इष्ट आहे. निदान यापैकी निकृष्ट दर्जाचे किंवा धान्य निवडताना पाखडून निघालेले धान्य अंगणातील कोंबड्यांना खाद्यासाठी द्यावे. त्यांच्या खाद्यात मांसाहाराची गरजही पूर्ण करायला हवी. मासोळी बाजारातून आणलेली सुकट कधी तरी द्यावी. आपण मटण, मासे आपल्यासाठी आणत असतो, तर त्यातून निवडलेला टाकावू भाग उन्हात वाळविल्यानंतर कोंबड्यांना द्यावा. हिरव्या भाजीपाल्यांचीही गरज असते. तेव्हा मेथी, कोथिंबीरीसारखे हिरव्या भाज्याही त्या आवडीने खातात. विशेषत: उन्हाळ्यात कोंबड्यांना हिरव्या भाज्यांचीही उणीव भासते, तेव्हा अशा अन्नघटकांकडेही लक्ष द्यावे. स्थानिक व देशी कोंबड्यांना योग्य प्रकारे खाद्य दिल्यास उत्पादन वाढविता येईल. जर शेतकरी मोठ्या प्रमाणात गावरान कोंबडी पालन करत असतील तर पुढील प्रमाणे खाद्य द्यावे.

**खाद्याचे प्रकार :** १. चिक मेश खाद्य, २. ग्रोवर मेश खाद्य, ३. लेयर मेश खाद्य ४. लेयर कॉन्सट्रेट, ५. प्रीमिक्स पहिले तीन प्रकारचे खाद्य हे पूर्णतः तयार खाद्यात उपलब्ध असून ते कोंबड्यांना वयोगटानुसार द्यावे.

**खाद्य देतेवेळी घ्यावयाची काळजी :** कोंबडीची जात, प्रकार, प्रवर्ग, वयोगट, भौगोलिक वातावरण, उत्पादन क्षमता, कोंबड्यांचे अनुवांशिक गुणधर्म या बाबींचा विचार करून योग्य ते खाद्य घटक असलेले पौष्टीक व संतुलिक खाद्य कोंबड्यांना द्यावे. ते प्रथिने, उर्जा, जीवनसत्वे, कार्बोदके व खनिजे इत्यादी घटकांनी संतुलित असावे. खाद्य जास्त कालावधीसाठी साठवून ठेवू नये.

**रोगराईपासून संरक्षण :** मोकळ्या कोंबड्या दिवसभर खाद्य शोधात मिळेल ते कीटक खातात. त्यासाठी गटार, दलदल अशा अत्यंत घाणेरड्या भागात फिरून खाद्य मिळवतात. साहजिकच रोगराईचा संसर्ग होणे, त्यामुळे विशेषत: पोटातील जंतांची संख्या दिवसेंदिवस वाढत राहते. साहजिकच कोंबडीच्या पोषणासाठी आणि अंडी निर्मितीसाठी पोषण मिळत नाही. यासाठी साधारणत: वरच्यावर नियमितपणे कोंबड्यांना पशुवैद्यकीय दवाखान्यातून जंताची औषधे नियमित द्यावीत. मोकळ्या कोंबड्यांना हगवणीचाही उपद्रव असू शकतो. असा उपद्रव झाल्यास पांढऱ्या खडूची अर्धा चमचा पावडर पोटॅशियम परमॅगनेटच्या गुलाबी पाण्यातून एक ते दोन दिवस द्यावी. किंवा पशुवैद्यकिय दवाखान्यातील औषधे द्यावीत. कोंबड्यांना पिसवा, कुक्कुट-उवा आदी रक्तपिपासू किटकांचा प्रादुर्भाव झाल्यास पाच टक्के 'गॅमेक्सिन पावडर' त्यांच्या पिसांना लावावी.

मोकळ्या कोंबड्यांना काही साथीच्या रोगांची लागण दरवर्षी होते. विशेषत: 'रानीखेत' रोगाची साथ दरवर्षी उद्भवते आणि साथीत सरासरी ६० टक्के कोंबड्या मृत्युमुखी पडतात. बहुतेक खुराडी पुर्णत: मोकळी होतात. या साथीची लागण बहुधा उन्हाळ्यात उद्भवते. तेव्हा उन्हाळ्यापूर्वी रोगप्रतिबंधक लसीकरण दरवर्षी केल्यास सदर साथीचा हमखास प्रतिबंध होतो. मोकळ्या कोंबड्यांना देवीच्या रोगाचीही लागण होण्याची दाट शक्यता असते. या साथीमुळे मृत्युसंख्या फारशी नसली तरी अंडी उत्पादन कमी होते, तेव्हा देवी प्रतिबंधक लसीकरणही नियमित करावे. लसीकरण हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे याकरिता शेतकऱ्यांनी योग्य वेळी लसीकरण करणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने स्थानिक कोंबडीचे पालन केल्यास या किरकोळ व्यवसायातून नियमित सकस आहार आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक फायदा होईल. शेतकऱ्यांनी एक दिवसाच्या पिल्लांपासून सुरुवात करावी. एक दिवसाचे पिल्लू घेऊन ते अंड्यावर येई पर्यंत अंदाजे १२० ते १५० रुपये खर्च होतो.

कुक्कुटपालन व्यवसाय करताना अंडीविक्रीतील उत्पन्नासोबतच उत्तम असे कोंबडी खत देखील मिळते. घरातील वाया गेलेले अन्न, भाजीपाला, धान्य किंवा आंतरपीक म्हणून घेतलेला मका यांचा वापर केल्यास उत्पादन खर्च आणखी कमी करता येऊ शकतो. परसातील कुक्कुटपालनाद्वारे अधिक अंडी व अधिक मांस असा दुहेरी फायदा पशुपालकांना होऊ शकतो.

**लागलेली भूक, रिकामा खिसा, तुटलेले मन आणि मिळालेली वागणूक जे शिकवते ते कुठलीच डिग्री शिकवत नाही...!**

## कृषी सल्ला

- तपमानात वाढ संभवत असल्याने आंबा पिकावर तुडतुडे व फुलकिडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. यासाठी मोहोराचे तुडतुडे, फुलकीड आणि भुरी रोगापासून संरक्षण करावे. यासाठी बोंगे फुटताना, कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (पाच टक्के प्रवाही) सहा मि.लि. अधिक हेक्झाकोनॅझोल (पाच टक्के प्रवाही) पाच मि.लि. प्रति १० लिटर पाणी याप्रमाणात वापर करावा.
- मोहोर अवस्थेतील काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीच्या किडींच्या नियंत्रणासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस (५० टक्के प्रवाही) एक मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.
- नारळावर रूगोज स्पायलींग व्हाईट फ्लायचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. या माशीच्या प्रादुर्भावामुळे पानांवर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. याच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड (१७.८ टक्के प्रवाही) ०.३ मि.लि. प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- उन्हाळी सूर्यफुल पीकासाठी पेरणीची वेळ : उन्हाळी – फेब्रुवारी (पहिला आठवडा). सुधारीत वाण : फुले भास्कर, एस.एस.५६, मॉर्डेन, भानू, एल.एस.११, फुले रवीराज (संकरित)
- मिरची पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता ६५ किलो युरिया प्रति एकरी या प्रमाणात फूल व फलधारण्याच्या वेळी द्यावा. तसेच रसशोषक किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डायमेथोएट (३० टक्के प्रवाही) एक मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

**माती सांगे शेतकऱ्याला,**
**पीकाला सुफला-उज्ज्वला खत घाला।**
**धनधान्याच्या राशी देतील, भरभराटीचा हवाला।।**

# कारले : आरोग्यासाठी हितकारक

डॉ. ए. एस. नाफडे, उद्यानविद्या तज्ञ, डी-६ ब्रह्मा मेमोरीस, भोसले नगर, पुणे - ४११००७, मो. ९८२२२६११३२

लोकांना कारल्याची भाजी त्याच्या कडवटपणामुळे कदाचित आवडत नसेल, पण या भाजीमध्ये खूप औषधी गुणधर्म असतात. कारल्यामध्ये प्रोटीन, कार्बोहायड्रेट, कॅल्शियम, फॉस्फरस, आयर्न, पोटॅशियम, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ए, सी, आणि इतरही पोषक तत्त्व आढळून येतात.

कारले शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यास मदत करते व गंभीर आजारांपासून दूर ठेवते. वजन घटवण्यापासून ते मधुमेह, मुतखड्यासारख्या समस्यांना दूर ठेवण्यापर्यंत कारल्याचा उपयोग होतो. कारले लोह समृद्ध आहे. हे अँटीऑक्सिडेंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी परीपुर्ण आहे.



**➢ मधुमेह नियंत्रणासाठी :** कडू कारले इन्सुलिन प्रमाणेच कार्यकारक आहे. खरं तर, एक ग्लास कारल्याचा रस घेणे इतके प्रभावी आहे की मधुमेह रूग्णांना त्यांच्या औषधांचा डोस कमी करता येईल. मधुमेहाच्या रुग्णांसाठी कारले अतिशय गुणकारी आहे. ते रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित राहण्यासाठी मदत करते.

**➢ त्वचा आणि केसांसाठी :** कारल्यामध्ये अँटीऑक्सिडेंट आणि जीवनसत्त्वे 'अ' आणि 'क' भरपूर असतात. ही त्वचेसाठी चांगली असतात. यामुळे वृद्धत्व कमी होते. डाग, सोरायसिस आणि खाज सुटणे अशा त्वचेच्या विविध संक्रमणांवर उपचार करण्यासाठी कारले उपयुक्त आहे. याचा रस केसांमध्ये चमक वाढवतो आणि कोंडा, केस गळणे थांबवतो.

**➢ यकृताच्या कार्यासाठी उपयुक्त :** कारले यकृताच्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. ते यकृत स्वच्छ ठेवते आणि त्याच्या पेशींच्या निर्मितीसाठी मदत करते. त्यामुळे यकृत दीर्घकाळापर्यंत चांगल्या प्रकारे काम करू शकते. मूत्राशय आणि आतडे देखील कारले खाल्ल्याने सक्षम होतात.

**➢ पचनासाठी चांगले :** कारली तंतुमय असल्याने आतड्यांची हालचाल सुधारण्यास मदत होते. या भाजीच्या सेवनाने बद्धकोष्ठता दूर होते. कारले पचनासाठी उत्तम आहे. त्यामधील अँटिऑक्सिडंट्स चयापचय क्रियेचा वेग वाढवतात.

**➢ हृदयाचे आरोग्य सुधारते :** कडू कारल्यामुळे एलडीएल (कोलेस्टेरॉल) कमी होते आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी होतो.

**➢ कारले कर्करोग रोग प्रतिकारशक्ती वाढवते:** कारले रोग प्रतिकारशक्ती वाढवते आणि ॲलर्जी प्रतिबंधित करते. त्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कर्करोगाशी लढण्यासाठी होतो. कारले नियमित सेवन केल्यावर स्तन आणि प्रोस्टेट कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. या वनस्पतीच्या जवळजवळ सर्व भागांमध्ये अँटीकॅन्सर गुणधर्म आहेत.

**➢ वजन व्यवस्थापन :** कॅलरी कमी आणि फायबर-समृद्ध असल्याने वजन कमी करण्यात कारले मदत करते.

**➢ जखमा बरे करते :** कारल्यामध्ये तीव्र उपचारांचे गुणधर्म आहेत. जे जखमांना त्वरेने बरे होण्यास आणि संक्रमण कमी करण्यास मदत करते.

**➢ रक्त शोधक :** कारल्या मध्ये जास्त प्रमाणात अँटीऑक्सिडेंट्स असल्याने दूषित रक्ताशी संबंधित बऱ्याच समस्या दूर होण्यास मदत होते. कारले नियमित सेवन केल्याने त्वचा, केस आणि कर्करोगाच्या समस्येमध्ये सुधारणा होते. तसेच रक्त परिसंचरण सुधारते.

**➢ शरीराला उत्साही करते :** नियमितपणे कारले घेतल्यानंतर शरीराची तग धरण्याची आणि उर्जा पातळीत उल्लेखनीय सुधारणा दिसून येते. झोपेची गुणवत्ता सुधारण्यात देखील मदत होते आणि निद्रानाशासारख्या झोपेच्या समस्या कमी करते

**➢ डोळ्यांना फायदा होतो :** कारले व्हिटॅमिन 'ए' समृद्ध आहे ते मोतीबिंदू प्रतिबंधित करते आणि दृष्टी मजबूत करते.

**➢ कारल्याचे इतरही फायदे :** कावीळ झाल्यास ताज्या कारल्यांचा रस सकाळ-संध्याकाळ घेतल्यास हा आजार दूर होतो. जंत किंवा कृमींचा त्रास असल्यास कारल्याची भाजी किंवा रस घेतल्याने कृमींचा त्रास कमी होतो. दमा, सर्दी, खोकल्याचा त्रास असेल तर कारल्याचा रस व तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून हे त्रास दूर होतात. कारले हे शक्तीवर्धक आहे म्हणून लहानमुलांच्या आहारातही कारल्याचा समावेश आवर्जून करावा. इसब, रॅशेस, कुष्ठरोग, सोरायसिस, जखमा आणि फोड यासारख्या त्वचेच्या विविध आजारांवर याचा चांगला उपयोग होतो.

उलट्या किंवा जुलाब होत असल्यास कारल्याच्या रसात थोडे पाणी मिसळून, त्यात काळे मीठ टाकून सेवन करावे लगेचच फरक पडतो. जेवणात कारल्याच्या भाजीने पचन चांगले होते. अपचन झाल्यास कारल्याचा रस घ्यावा.

पक्षघात झालेल्या रुग्णांना कच्चे कारले फायदेशीर ठरते. दमा असलेल्यांनी मसाला न टाकलेली कारल्याची भाजी खाल्ल्यास फायदेशीर आहे. मुतखड्याच्या रुग्णांसाठी कारले उपयुक्त आहे. कारल्याच्या सेवनामुळे मुतखडे फुटून ते मूत्रमार्गाने बाहेर पडू शकतात.

तारुण्यपिटिकेसाठी ते महत्त्वाचे ठरले आहे. कारल्यात अँटीइन्फ्लामेंटचे गुण आहेत जे त्वचेतून हानीकारक घटकांना दूर करतात. त्यामुळे तारुण्यपिटिका किंवा त्वचेवरील पुटकुळ्यांची समस्या दूर होते. अतिसार आणि पोटदुखीपासून बचाव करण्यासाठी कारल्याचा नियंत्रित वापर करा. गर्भवती महिलांनी कारल्याचे सेवन करणे टाळावे कारण यामुळे गर्भाशय आकुंचित होतो.

कारले नियमितपणे सेवन केल्यास दमा आणि ब्रोंकाइटीससारख्या श्वासासंबंधी गंभीर आजारांवर मात करता येते. कर्करोगाशी सामना करण्यासाठी कारले गुणकारी आहे. कर्करोगाच्या पेशींशी लढण्यासाठी ते शरीराला मदत करते, हे आतापर्यंतच्या अनेक संशोधनांमध्ये दिसून आले आहे.

## ।। संतवचन ।।

**भगवंत आपल्याला समजण्यासारखा आहे, कारण सत्यस्वरूप प्रत्येकाला कळावे ही त्याचीच इच्छा आहे आणि हे कार्य फक्त मनुष्य जन्मामध्येच शक्य आहे. पण त्याकरीता भाव, तळमळ, इच्छा मनातून निर्माण व्हायला पाहिजे. पुष्कळ चांगला स्वयंपाक केला आणि मीठ घालायचेच राहिले तर काय उपयोग? भजन-पूजन चांगले झाले पण भाव किंवा हेतू दुजा ठेवला तर चांगले झाले असे कसे म्हणावे...?**



## व्हॉट्स ॲप कट्टा

*चांगला स्वभाव हा गणितातल्या शुन्यासारखा असतो. ज्याच्या सोबत असतो त्याची किंमत नेहमीच जास्त असते.*

# टोमॅटो : रोग व कीड नियंत्रण

डॉ. राणी जाधव, सहाय्यक प्राध्यापक (अन्न प्रक्रिया विभाग)
अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती

टोमॅटो पिकाची लागवड करताना या पिकाचे रोग व किडींपासून संरक्षणाची महत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागते. अन्यथा उत्पादनामध्ये घट येण्याची शक्यता असते. शेतकऱ्यांना ही माहिती असणे जरूरीचे आहे.

**बुरशीजन्य रोग : रोप कोलमडणे किंवा रोपांची मर (डॅंपिंग ऑफ) :** 'पिथियम' (Pythium) या बुरशींमुळे हा रोग होतो. त्यामुळे वाफ्यातील रोपे जमिनीलगत कुजतात आणि कोलमडून सुकून जातात. **उपाय योजना :** रोपांचे वाफे लागवडीपूर्वी फॉर्मॅलिन रसायनद्रव्याने निर्जंतुक करावेत. तसेच बियांना जर्मिनेटर आणि प्रोटेक्टंटची बीजप्रक्रिया करावी. जर्मिनेटरचे ड्रेचिंग करावे. जमिनीतून पाण्याचा निचरा होणे अत्यावश्यक असते. याच्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रिड (१७.८ एसएल) पाच मि.लि. + मॅन्कोझेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या द्रावणात पुनर्लागवडीपूर्वी रोपे १० मिनिटे बुडवून लागवड करावी.

**करपा (अर्ली ब्लाइट) :** हा रोग 'अल्टरनेरिया सोलानी' (Alterneria solani) या बुरशीमुळे होतो. जमिनीलगतच्या पानांपासून या रोगाची सुरुवात होते. प्रथम पाने पिवळी पडतात. पानांवर तपकिरी ठिपके दिसू लागतात. दमट व उष्ण हवेत या रोगाचा प्रसार झपाट्याने होतो. याच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा प्रोपिनेब १५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**मर रोग (फ्युजॅरियम विल्ट) :** हा रोग जमिनीतील 'फ्युजॅरियम' (Fusarium oxysporum) या बुरशीमुळे होतो. खालची पाने पिवळी पडून गळून जातात व झाडांची वाढ खुंटते. **उपाय :** पेरणीपुर्वी किंवा लागवडीपुर्वी बिजप्रक्रिया करावी. हा रोग जमिनीतील बुरशीमुळे होत असल्याने पिकांची फेरपालट करताना रोग प्रतिबंधक जातींची निवड करावी.

**विषाणुजन्य रोग : पर्णगुच्छ किंवा बोकड्या (लिफ कर्ल) :** पाने सुरकुतल्यासारखी होऊन पानांची वाढ खुंटते व त्यांचा रंग फिकट हिरवा दिसतो. वाढीच्या सुरुवातीला रोग असल्यास फलधारणा होत नाही. या रोगाचा प्रसार पांढऱ्या माशीमुळे होतो. याच्या नियंत्रणासाठी रोगट झाडे दिसल्याबरोबर उपटून त्यांचा नाश करावा. रोगाचा प्रसार पांढऱ्या माशीमार्फत होत असल्याने तिच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट किंवा मिथिल पॅराथिऑन या किटकनाशकांची फवारणी करावी.

**भुरी :** हा रोग पानांवर व फुलांवर येतो. या रोगाची पांढरट पिठासारखी बुरशी पानाच्या पृष्ठभागावर व खालच्या बाजूस येते. **उपाय :** रोग दिसताच पाण्यात मिसळणाऱ्या या गंधकाच्या (०.२५%) १० लिटर पाण्यात २५ ग्रॅम या प्रमाणात १० दिवसांच्या अंतराने दोन-तीन फवारण्या कराव्यात.

**कीड : फळे पोखरणारी अळी (हेलीओथीस आर्मिजरा) –** मादी पतंग पानांवर, फुलांवर अंडी घालतात. अंड्यातून बाहेर पडल्यानंतर अळी कोवळी पाने खाऊन वाढते. जानेवारी ते मे दरम्यान या अळीचा प्रादुर्भाव जास्त असतो. परोपजीवी किटकांमध्ये ट्रायकोग्रामा आणि कंम्पोलेटिस क्लोरोडी या नावाचे कीटक आहेत. ट्रायकोग्रामा हे किटक फळे पोखरणाऱ्या अळीच्या अंड्यावर उपजीविका करतात, तर कंम्पोलेटिस या कीटकाच्या अळ्या फळे पोखरणाऱ्या अळीवर जगतात. मानवी आरोग्याच्या दृष्टीने या किडींच्या नियंत्रणासाठी जैविक उपायांचा अवलंब करावा. मात्र प्रादुर्भाव अधिक असल्यास १५ मि.लि. नोव्हॅलीरॉन (१० टक्के इसी) किंवा क्लोरॅन ट्रॅनिलीप्रोल (१८.५ टक्के एसएस) प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

(पुढील मजकूर पान १५ वर)

# सुर्यफूलातील रोगांचे नियंत्रण

**प्रा. रुपेशकुमार जगन्नाथ चौधरी, (वनस्पती रोगशास्त्र विभाग),**
**केवलरामजी हरडे कृषी महाविद्यालय, चामोर्शी, जिल्हा – गडचिरोली, मो. ९४०३२४१६८४.**

भारतामध्ये घेण्यात येणाऱ्या तेलबिया पिकांमध्ये सूर्यफूल हे एक महत्वाचे पीक आहे. सूर्यफुलाच्या तेलात मोनोअनसॅच्युरेटेड व पॉलीअनसॅच्युरेटेड ॲसिड असल्यामुळे रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. त्यामुळे हृदय विकाराच्या रुग्णांसाठी हे तेल अत्यंत उपयोगी आहे. सूर्यफुलाच्या तेलाच्या उत्पादन वाढीसाठी पिकांवर येणाऱ्या कीड व रोगांचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते.



**सूर्यफुलावरील येणारे महत्त्वाचे रोग : १) करपा रोग :** हा एक बुरशीजन्य रोग आहे. मुख्यत्वे खरीप हंगामात दिसून येतो. हा रोग 'अल्टेरनॅरीया हेलिॲंथी' (Alternaria helianthi) नावाच्या बुरशीमुळे होतो व या बुरशीची बिजुके बियाण्यावर व पिकाच्या अवशेषांवर जमिनीत आढळुन येतात व तेथून ती संक्रमित होतात. रोगाचा दुय्यम प्रसार हवेद्वारे होतो. खरिपामधील ढगाळ वातावरण अधून मधून पाऊस, कमी तापमान व जास्तीची आर्द्रता यामुळे हा रोग बळावतो. रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे जमिनी लगतच्या पानांवर पेरणीनंतर सुमारे ३०-४० दिवसांनी लहान वर्तुळाकार तांबूस ठिपके दिसून येतात. पुढे हे एकत्र मिसळून काळसर चट्ट्याच्या स्वरूपात पानांवर दिसतात. पोषक वातावरणात हा रोग रोपांच्या खोडावर, पानांवर व सूर्यफुलाच्या पाठीमागील भागावर देखील चट्ट्याच्या स्वरूपात आढळून येतो. यामुळे रोगग्रस्त पाने वाळून जातात व रोपांची अन्न तयार करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊन उत्पादनात घट येते.



**२) केवडा रोग :** हा बुरशीजन्य रोग असून Plasmopara halstedii या बुरशीमुळे होतो. रोगाची बिजुके बियाण्याद्वारे व जमिनीत असणाऱ्या सुप्त बिजुकांद्वारे प्रसारित होतात. या रोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे रोपांची उंची वाढत नाही. झाड खुजट होते. रोगग्रस्त झाडांची पाने पिवळसर पडतात, आर्द्रता जास्त असल्यास पानांच्या पाठीमागे पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते. रोगग्रस्त झाडांच्या फुलांमध्ये बीजधारणा शक्यतो होत नाही व झाल्यास बी हलके व पोचट राहते आणि उत्पादनात घट होते.



**३) तांबेरा रोग :** हा हवेद्वारे पसरणारा बुरशीजन्य रोग आहे. या रोगाची लागण मुख्यत्वे Puccinia helianthi या बुरशीमुळे रब्बी हंगामात साधारणपणे पीक ७०-७५ दिवसाचे असतांना होते. पानांवर खालच्या बाजूस नारिंगी/तपकिरी रंगाचे फोड येतात व कालांतराने ते काळपट किंवा गर्द करड्या रंगाचे होतात. रोगाची तीव्रता जास्त असल्यास पूर्ण पानावर दोन्ही बाजूस ठिपके विखुरलेले असतात. या रोगामुळे पाने करपतात, गळून पडतात व बीज भरत नाही.

**भुरी :** हा रोग Erysiphe cichoracearum या बुरशीमुळे होतो. पानांवर तसेच जुन्या खोडांवर पांढऱ्या तपकिरी रंगाची बुरशी दिसून येते.

(पान १५ वर)

# जपणूक आमची सामा



शेतकरी सभा, अंजनवटी,
तालुका व जिल्हा – बीड



उत्पादन प्रात्यक्षिक, बोरी, तालुका – जुन्नर,
जिल्हा – पुणे



माती परीक्षण कार्यक्रम, निलज,
तालुका–जिल्हा – गोंदिया



शेतकरी सभा, चांदोली, तालुका– साकोली,
जिल्हा – भंडारा




शेतकरी सभा, शेंदुरजना आढाव,
तालुका– मानोरा, जिल्हा– वाशिम



शेतकरी सभा, वाई,
तालुका–जिल्हा–यवतमाळ

# जिक बांधीलकीची...



कृषी मेळावा व रब्बी पीक परिसंवाद, नांदुरी,
तालुका– तुळजापूर, जिल्हा –उस्मानाबाद



माती परीक्षण दिन, साबा,
तालुका व जिल्हा – परभणी



शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम,
जिल्हा–अकोला



शेतकरी सभा, वारंगा,
तालुका व जिल्हा – नागपूर



माती परीक्षण दिन, करमाले,
तालुका– अलिबाग, जिल्हा – रायगड



शेतकरी सभा, वासगांव,
तालुका– डहाणू, जिल्हा– पालघर

# पौराणिक फुलांची माहिती व ओळख

**प्रा. अंकित सुनील खेडीकर (उद्यानविद्या विभाग),**
**सेवकभाऊ वाघाये पाटील, कृषी महाविद्यालय केसलवाडा, जिल्हा – भंडारा. मो. ७०६६६४४६८८**

**जस्मिन :** जगात जस्मिनचे २०० प्रकार उपलब्ध आहेत. आपल्याकडे त्याला मोगरा, जाई, जुई, चमेली, साईली, नेवाळी अशा अनेक प्रकारात ओळखतो. ही सर्व फुले बहुतेक पांढऱ्या रंगात वेलीवर येतात. ह्यांचा मोसम वसंत ऋतूत आणि उन्हाळ्यात असतो. भारता इतकेच इतर देशातही जस्मिनचे महत्त्व अधिक आहे. इंडोनेशियाचे हे राष्ट्रीय फूल आहे तर फिलिपाईन्स मध्ये देवतांना जस्मिनचे हार घालण्यात येतात. थायलंड मध्ये जस्मिनला आईचे प्रतिक मानले जाते.



**चाफा :** वसंतात उमलणारी चाफ्याची फुले त्यांच्या हिरव्या लांबट पानांच्या पार्श्वभूमीवर आपले लक्ष वेधून घेतात. अनेक उपजाती असणारी ही फुले मुळची मेक्सिको, मध्य अमेरिकेत आणि व्हेनेझुएला मध्ये सापडतात. मुख्यत: पांढऱ्या रंगात असणारी ही फुले भडक गुलाबी, थोडीशी पिवळसर रंगा मध्येही पहायला मिळतात. ह्या फुलांना रात्री अधिक गंध असतो. त्यामुळे विशिष्ट किटक आकर्षित होऊन त्यांचे परागीकरण होते. तशीही या झाडांची फांद्या लावूनही लागवड करता येऊ शकते.



**कैलासपती :** मराठीत 'कैलासपती', तामिळ मध्ये 'नागलिंगम', तेलगूत 'मल्लिकार्जून' आणि इंग्रजीत "Cannonball Tree' म्हणून ओळखले जाणारे हे झाड फारसे बघायला मिळत नाही. कैलासपतीचे फुल अतिशय वैशिष्टपूर्ण असते. फुलाच्या मध्यभागी शंकराच्या पिंडीचा आकार असून बाजूने अतिशय बारीक रेषा सामावलेल्या असतात. ह्याचा सुगंधही मोहक असतो.



**सुरंगी :** हार आणि गजऱ्यासाठी ही फुले वापरली जातात. थोडीशी पिवळसर चॉकलेटी रंगात असणारी ही फुले सुगंधीत असतात. फुलांच्या कळ्या लालसर असून गोल आकारात असतात. पाकळ्याही मोठ्या आणि गोलाकार रंगात असतात. ह्या फुलांचा सुगंध इतका उग्र असतो की अगदी अर्धा किलोमिटर लांबूनही ह्याचा फुलांचा सुगंध आपल्याला मोहवून टाकतो. नेटवर ह्या फुलांविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही तसेच फोटोही कमी पहायला मिळतात.



**केतकी :** केवड्याच्या फुलांचा पौराणिक काळातही उल्लेख आहे. केवड्याचा सुगंध अतिशय मनमोहक असल्यामुळे अत्तरात आणि सुगंधी तेलात त्याचा उपयोग केला जातो.





**गुंजा :** गुलाबी फुलांच्या ह्या भडक लाल-काळ्या रंगातल्या बिया दागिन्यांसाठी वापरल्या जात असत. ह्या बिया तुरट असून विषारी असतात. योग्य रितीने सेवन केल्यास त्यातल्या औषधी गुणांचा लाभ होऊ शकतो. डोक्यातल्या उवा मारण्यासाठीच्या औषधातही गुंजांचा वापर केला जातो.



**नागकेसर :** नागकेसरचे मूळ स्थान आहे श्रीलंका. तेथील चौथा दापुला राजाने ९६ हेक्टर विस्तारावरच्या ठेवलेल्या राखीव जंगलात प्रामुख्याने नागकेसरची लागवड आढळते. आजही हे नैसर्गिक जंगल शिल्लक आहे. आपल्याकडे ईशान्य भागात व पश्चिम घाटात उंचीवर ही झाडे आहेत. फूले पांढऱ्या रंगाची असून पाकळ्यांच्या मधोमध पिवळ्या केसरदल झुबका असतो. फुलाला खूप छान वास येतो. झाडाचे लाकूड गडद तांबडसर रंगाचे असते. ते अतिशय भक्कम व वजनदार असते. पूर्वी रेल्वेच्या स्लीपर्ससाठी ते वापरले जाई.

## टोमॅटो : रोग व कीड नियंत्रण...

(पान १० वरून पुढे)

**नागअळी** (लिफ मायनर) : या किडीच्या अळ्या पानांच्या पापुद्र्यात शिरून मधील हिरवा भाग पोखरून खातात. त्यामुळे पाने पांढरी पडतात. पानांच्या अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेवर अनिष्ट परीणाम होतो. यासाठी अळीचा प्रादुर्भाव दिसताच पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

**तुडतुडे, पांढरी माशी व मावा :** हे कीटक पानांतला अन्नरस शोषून घेतात व विषाणुजन्य रोगांचा प्रादुर्भाव करतात. याच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा.

## सुर्यफूलातील रोगांचे व्यवस्थापन...

(पान ११ वरून पुढे)

**४) शेंडेमर किंवा नॅक्रोसिस रोग :** हा विषाणूजन्य रोग आहे. सूर्यफुलाच्या पानांवर हा रोग दिसून येतो. हा रोग प्रामुख्याने फुलकिड्यांमार्फत प्रसारित होतो. या रोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे रोप अवस्थेत झाडांच्या शेंड्याच्या जवळील पानांवर काळपट व गोलाकार असे असंख्य ठिपके दिसून येतात. पाने वक्राकार होतात. वरील महत्वाच्या रोगांच्या नियंत्रणासाठी खालील उपाययोजना केल्यास या रोगांचे व्यवस्थापन चांगल्या रीतीने करता येईल.



➤ शेतामधील काडी कचरा वेचून काढून बांध स्वच्छ ठेवावेत. ➤ करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी तीन ग्रॅम थायरम किंवा दोन ग्रॅम कार्बेन्डॅझिम प्रति किलो बियाण्यास चोळून बीज प्रक्रिया करावी किंवा रोग नियंत्रणासाठी मॅंकोझेब २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ➤ केवडा रोग नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झिल हे बुरशीनाशक तीन मि.ली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ➤ तांबेरा रोग निवारण करण्याकरिता शक्यतो संकरित वाणांची पेरणी करावी तसेच मॅंकोझेब किंवा झायनेब यांची फवारणी करावी. ➤ नॅक्रोसिस / शेंडेमर रोगाच्या प्रतिबंधासाठी रोग प्रसारक किडींचे नियंत्रण करावे. तसेच पेरणीपूर्वी इमिडाक्लोप्रिड पाच ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळून बीजप्रकीया करावी. ➤ भूरी रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनेझॉल (२५ इसी) एक मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून सुरवातीच्या काळात फवारणी करावी.

**जीवनातील कोणत्याही दिवसाला दोष देऊ नका...कारण**
**उत्तम दिवस आठवणी देतात, चांगले दिवस आनंद देतात, वाईट दिवस आपल्याला अनुभव व शिकवण देतात...!**

# सुरण लागवड तंत्रज्ञान

संजुला विलास भावर, वैभव गणेशराव लाजुरकर
उद्यानविद्या विभाग, डॉ.पं.दे. कृषी विद्यापीठ अकोला, मो. ८६००३४४०९७

आजकाल सुरण हे कंद पीक अधिक उत्पादन क्षमता आणि स्वयंपाकासाठी उपयुक्त अशा गुणधर्मामुळे मोठ्याप्रमाणावर प्रसिध्द होत आहे. भारतामध्ये आंध्रप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, केरळ बिहार आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये याचे प्रामुख्याने उत्पादन घेतले जाते. सुरणामध्ये प्रामुख्याने प्रथिने आणि पिष्ठमय पदार्थ (स्टार्च) आढळतात. त्याचबरोबर औषधी गुणधर्मही आढळतात. प्रामुख्याने मुळव्याध, हगवण, दमा, फुफ्फुसाला येणारी सूज, रक्त शुध्द करणे व उलटी यासाठी सुरण अत्यंत गुणकारी ठरतो. सुरणामध्ये प्रामुख्याने कॅल्शिअम, स्फुरद आणि जीवनसत्व 'अ' 'क' आणि 'इ' हे घटक आढळतात. सुरण अतिशय पौष्टिक असते. या कंदामध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि टॅनिनसारखे आरोग्यवर्धक घटक असतात. सुरण हे पीक हळद, नारळ, केळी या प्रमुख पिकांमध्ये आंतरपीक म्हणून सुद्धा घेतले जाते.



सुरण हे उष्णकटिबंधातील एक कंदवर्गीय पीक आहे. याच्या जवळपास ८०-९० प्रजाती आढळतात. त्यापैकी खूपच कमी ह्या खाण्यायोग्य आहेत. सुरणाचे उगमस्थान भारत किंवा श्रीलंका आहे असे समजले जाते.

**हवामान :** सुरण उत्पादनासाठी २५-३० अंश. से. तापमान त्याचबरोबर दमटपणा व ८०-९० टक्के वातावरणीय आर्द्रता चांगली मानवते. उष्ण व दमट हवामान सुरवातीच्या वाढीस आवश्यक असते त्यानंतर मात्र कंदाची चांगली वाढ होण्यासाठी कोरडे हवामान लागते. सर्वसाधारण १०००-१५०० मी.मी. पाऊस कंदाची वाढ चांगली होण्यासाठी उपयुक्त ठरतो.

**जमीन :** सुरण हे पीक प्रामुख्याने मध्यम ते हलक्या जमिनीत चांगले उत्पन्न देते. अधिक सेंद्रिय पदार्थ व भुसभुशीत जमीन कंदाच्या वाढीसाठी उपयुक्त ठरते. पाणी साचून राहिल्यास कंद कुजतात.

**अभिवृद्धी :** काढणीनंतर कंद तीन-चार महिने सुप्तावस्थेत जातात. त्यामुळे कंदाची लागवड आणि काढणी एका विशिष्ट कालावधीत करावी लागते. सुरणाची लागवड ही कंदाने (धनकंद) केली जाते. मातृकंदाच्या बाजूने येणारे लहान कंद लागवडीसाठी वापरतात. कंदाला थायोयुरिया, इथ्रेल, इत्यादीची प्रक्रिया केल्यास सुप्तावस्थेचा कालावधी कमी होऊन कंदाला कोंब लवकर येतात.

**जाती :** गजेंद्र, श्रीपद्मा, श्रीअथिरा (संकरीत), कुसुम, नरेंद्र, आशा या अधिक उत्पादन देणाऱ्या व न खवखवणाऱ्या जाती आहेत.

**लागवडीयोग्य कंदाचा आकार (वजन) :** लागवडीसाठी वापरण्यात येणाऱ्या कंदाचा आकार हा शेवटी काढणीच्या वेळेस मिळणाऱ्या कंदाच्या आकारावर परिणाम करतो. जितका मोठा कंद लागवडीसाठी वापरला जातो तितका मोठा कंद काढणीच्या वेळेस तयार होतो.

**लागवडीपूर्वीची प्रक्रिया :** जर लागवडीसाठी कमी कंद उपलब्ध असतील, अशा वेळेस कंद कापून लावावे लागतात. जर कंद कापून लागवड करायची

असल्यास कंद कुजू नये व चांगले कोंब यावे यासाठी कंदाला प्रक्रिया करण्याची गरज असते, त्यासाठी लागवडीपुर्वी बीजप्रक्रिया करावी यासाठी शेणाची स्लरी + मॅन्कोझेब (०.२%) + मोनोक्रोटोफॉस (०.०५%) या मिश्रणामध्ये कंद ५-१० मी. बुडवून ठेवावेत व नंतर २४ तास सावलीत सुकवून लागवड करावी.

**लागवडीची पध्दती :** जमीन २०-२५ से.मी. खोलीपर्यंत दोन-तीन वेळा नांगरून माती बारीक भुसभुशीत करून सपाट करून घ्यावी. सपाट वाफ्यांपेक्षा खड्डे पद्धतीने लागवड केल्यास अधिक उत्पादन मिळते. दोन कंदांमधील अंतर हे कंदाच्या आकारानुसार ठेवावे. कंद एक किलो पेक्षा मोठा असेल तर ९० से.मी. × ९० से.मी. इतके ठेवावे.

**लागवडीचा हंगाम :** पाऊस येण्यापूर्वी किंवा पाऊस सुरू होताक्षणी मे ते जून महिन्यात लागवड करावी. पूर्व भारतामध्ये फेब्रुवारी ते मार्च या महिन्यांमध्ये लागवड केली जाते मात्र या कालावधीत सिंचन व्यवस्था करावी लागते.

**खत व्यवस्थापन :** सुरण हे पीक सेंद्रिय व रासायनीक खतांना चांगले प्रतिसाद देते. लागवडीपूर्वी **शेणखत** सहा टन, **सुफला १५:१५:१५ –** २९३ किलो, **म्युरेट ऑफ पोटॅश (एमओपी) –** २७ किलो, **बेन्टोनाईट सल्फर –** १० किलो तसेच लागवडीनंतर ५० दिवसांनी **उज्ज्वला युरीया –** १०४ किलो प्रति एकरी याप्रमाणे खत व्यवस्थापन करावे.

**पाणी व्यवस्थापन :** जर उन्हाळी पीक घ्यायचे असल्यास लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे त्यानंतर मात्र सात-आठ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पावसाळ्यात लागवड केल्यास पाणी द्यायची गरज भासत नाही मात्र खूप वेळ पाऊस झाला नाही तर मात्र पाणी द्यावे लागते.

**किडी व रोग : १) पिठ्या ढेकुण –** हे ढेकुण प्रामुख्याने कंदावरील मुळांवर उपद्रव करतात. क्वचित खोड व पानांवरती आढळतात. ह्या ढेकुणांचा प्रादुर्भाव प्रामुख्याने कंद काढणीनंतर आढळतो. नुकसान झालेले कंद आकुंचन पावतात आणि जर का असे कंद लागवडीसाठी वापरले तर ह्या कंदाला कोंब येत नाही. या किडीच्या नियंत्रणासाठी लागवडीसाठी किडविरहित कंद वापरावेत. लागवड करताना कंद बीज प्रक्रिया करून वापरावेत.

**२) सुत्रकृमी :** ही कीड कंद व मुळांमध्ये आढळते. याचा प्रादुर्भाव पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळात आढळतो. याच्या नियंत्रणासाठी सुत्रकृमी विरहित कंद वापरावेत. लागवडीच्या वेळेस एरंड पेंड किंवा कडूनिंब पेंड एक टन प्रती एकरी टाकल्यास सूत्रकृमींचा प्रभाव कमी होतो. कार्बोफ्युरॉन ५ ग्रॅम प्रती झाड टाकल्यास प्रभावीपणे सूत्रकृमींचे नियंत्रण होते.

**३) पानावरील ठिपके :** सुरुवातीच्या काळात पानांवर लालसर-काळे गोलाकार ठिपके आढळतात. याच्या नियंत्रणासाठी कॅप्टन ०.२% किंवा मॅन्कोझेब ०.२५%च्या १५ दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या घ्याव्यात.

**काढणी :** सुरण हे सहा-सात महिन्याचे पीक आहे. पाने पिवळी पडणे किंवा झाड खाली वाकणे यावरून समजावे की पीक काढणीयोग्य झाले आहे. सर्वसाधारण नोव्हेंबर महिन्यात काढणी केली जाते. जर बाजारात मागणी अधिक असेल तर लवकर सुद्धा काढणी केली जाते याउलट मात्र जर मागणी नसेल तर काढणी न करता कंद वर्षभर जमिनीत ठेवले तरी राहतात मात्र उंदीर व घूस कंद खाणार नाही याकडे लक्ष द्यावे. सर्वसाधारण २०-५० टन प्रति हेक्टरी उत्पादन मिळते. परंतु उत्पादन हे लागवडीसाठी वापरलेल्या कंदाच्या आकारमानावर व पिकाचे व्यवस्थापन यावर अवलंबून असते.

# आधुनिक पद्धतीने विलायती भाजीपाला व फळ उत्पादन

श्री. मकरंद चुरी, उपाध्यक्ष उत्तर कोकण चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड अॅग्रीकल्चर,
निसर्ग निर्माण अॅग्रो प्रा. लि., माटुंगा, मुंबई, मो. ९८२११११२१०२



जागतिकीकरणामुळे आज जग कमालीचे जवळ आले आहे. जगातील कोणत्याही देशाची उत्पादने आपल्याला सहजपणे मिळू लागली आहेत. परदेशी पर्यटकांना त्यांच्या देशांत मिळणारे अन्नपदार्थ येथे मिळण्याची अपेक्षा असते. ज्या ठिकाणी असे पदार्थ मिळतात त्या हॉटेलकरिता परदेशी पर्यटकांची किंवा उद्योजकांची पसंती असते. अशा पर्यटकांच्या निमित्ताने भारतीयांनाही नवनवीन पदार्थांची ओळख होऊ लागली आहे.

मोठ्या शहरांतूनच नव्हे तर लहान शहरांतसुद्धा आता मॉल्स उभे राहात आहेत. परदेशी वस्तूंच्या बरोबरीने ह्या मॉल्समध्ये विलायती भाज्या आणि फळे विकत मिळतात. आपल्याकडील हॉटेल्स व रेस्टॉरन्टमध्येही या परदेशी भाज्या फळांचे पदार्थ मिळू लागले आहेत.

विलायती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्व भाज्या पूर्वी आयात केल्या जात होत्या. हवामानाच्या दृष्टीने आपल्या देशांत विविधता आहे. अशी भौगोलिक विविधता लाभलेला देश जगभरात नसेल असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. त्यातूनही महाराष्ट्र हा भारताच्या मध्यभागी असल्यामुळे सर्वात उत्कृष्ट हवामान आपल्याला लाभले आहे. हे तर नॅचरल ग्रीन हाऊस आहे, असे म्हटले तरी हरकत नाही. त्यामुळे बऱ्याचशा भाज्या, विलायती भाज्या आपण वर्षभर पिकवू शकतो. यांतील कांही शेतात उघड्यावर जमिनीमध्ये वाफे तयार करून त्यामध्ये विविध प्रकारच्या भाज्यांची लागवड होऊ शकते. ह्यासाठी साधारणतः ठिबक सिंचनाने किंवा तुषार पद्धतीने पाणी द्यावयाचे असते. काही भाज्या पिकविण्यासाठी विशिष्ट तंत्रज्ञानाची गरज असते. त्यासाठी खालील वेगवेगळ्या प्रकारांनी लागवड करावी लागते.

- नेट टनेल करूनही विलायती भाज्यांची लागवड करता येते. उंच नेट हाऊस करून विलायती भाज्यांची लागवड केली तर अतिशय उत्तम प्रतीचे व फायद्याचे उत्पन्न घेता येते. परंतु पावसाळ्यात जास्त पाऊस असेल तर उत्पन्न घेता येत नाही. जास्त पाऊस असेल तर नेट काढून ठेवावे लागते.
- काही विलायती भाज्यांसाठी पॉली हाऊस (ग्रीन हाऊस) उभारावी लागतात. ह्या ग्रीन हाऊसमध्ये एका बाजूस फॅन (पंखा) जो हवा बाहेर फेकत असतो व दुसऱ्या बाजूस पॅड असते ज्याच्यावर पाणी सोडले जाते किंवा स्प्रिंकलर्स व फॉगर्स बसविले जातात. जेणेकरून पिकाच्या वाढीस आवश्यक असणारा थंडावा पॉलीहाऊसमध्ये राखणे शक्य होते. काही ठिकाणी ह्याचे नियंत्रण संगणकावर सुद्धा केले जाते. साधारणतः रंगीत सिमला मिरची, ब्रोकोली आणि अनेक प्रकारची लेट्युसेस निर्मिती पॉलीहाऊसमध्ये केली जाते.

काही ठिकाणी जमीन म्हणून कोकोपीट किंवा कोकोपीट व माती मिश्रण करून वापरतात. पॉलीहाऊसच्या उभारणीसाठी सुरुवातीला मोठा खर्च करावा लागतो. परंतु अधिक काळपर्यंत मिळणारे उत्पन्न लक्षात घेता तो खर्च कमीच मानावा लागेल.

नेट हाऊस किंवा पॉलीहाऊसमध्ये रोगांचा आणि किडींचा प्रादुर्भाव तितकासा होत नाही. स्वाभाविकच कीटकनाशकांची विशेष गरज लागत नाही. कीटकनाशकाच्या व खतांच्या मर्यादित वापरामुळे कामे कमी वेळांत उरकता येतात.

विलायती भाज्यांची शेती करताना जमिनीचा सामू पाहणे महत्त्वाचे असते. माती तपासणीमुळे सामू तसेच जमिनीतील घटकांची माहिती होते आणि पिकाला आवश्यक असणारे जे घटक जमिनीत नाहीत ते खताच्या रुपाने देता येतात. आवश्यक घटक योग्य प्रमाणात मिळाल्यास उत्पादन चांगले येते.

माती हे माध्यम न वापरता देखील विलायती भाजीपाला उत्पादन घेतले जाते. या प्रकाराला 'हायड्रोपॉनिकस सिस्टीम' म्हणतात. ही शेती म्हणजे उत्पादनाचा कारखानाच म्हणावा लागेल. वर सांगितलेल्या शेती प्रकारापेक्षा २५ टक्के कमी वेळात उत्पादन होत असते. त्यामुळे वर्षभरात अधिक पिके घेता येतात. शिवाय मिळणाऱ्या भाज्याही अतिशय उत्कृष्ट प्रतीच्या असतात. मात्र अशा प्रकारच्या शेतीसाठी फारच मोठी गुंतवणूक करावी लागते.

विलायती भाजीपाला प्रकारात ॲस्परागॅस, बेबी कॉर्न, ब्रोकोली, रेड कॉबेज, लाल व पिवळी सिमला मिरची, स्वीट कॉर्न, फेनेल, बेझील वेगवेगळ्या प्रकारचे ७ ते ८ हर्बस, लीक्स, आईसबर्ग व आणखी १० ते १२ प्रकारची लेट्युस, बटन मशरूम, पार्सली, स्नो पीज, चेरी टोमॅटो, हीरवी व पिवळी झुकीनी असे साधारणतः भाज्यांचे ६० पेक्षा जास्त प्रकार व फळांचे १० तरी प्रकार आज आपल्याकडे वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित केले जातात, जे पूर्वी आयात केले जात असत.

जमीनीची कमतरता असलेल्या व जमीनीत पूर्वापार असलेली लागवड किंवा झाडे याच्यामुळे मोकळ्या जमीनीचा थोडा अभावच आहे. जेथे मोकळी जमीन उपलब्ध आहे तेथे लागवड शक्य आहे. उत्पादनांतील गुणवत्ता व सातत्य राखण्यासाठी सर्व भाज्यांची लागवड नियमित करावी लागते. जेणेकरून वर्षातील जास्तीत जास्त महीने याचे उत्पादन घेऊन पुरवठा करता आला पाहिजे. कारण ह्याचा पुरवठा मुख्यत्वे मोठ्या व तारांकित हॉटेलनां असल्याने आणि त्यांच्या मेनुवर हे पदार्थ कायम असल्यामुळे वर्षभर पुरवठा करण्याची निश्चिती त्या हॉटेलना हवी असते. त्याप्रमाणे दर व सर्व अटींसहीत पालन करावे लागते.

या सर्व भाज्या पिकविण्यासाठी वेगवेगळ्या तंत्र पद्धती आहेत. काही भाज्या एकदा लावल्यावर ठरावीक कालावधीत काढणी करावी लागते, तर काही भाज्यांची रोपे पुढील काही महीने उत्पादन देत असतात. जर व्यवस्थीत लक्ष देऊन काम केले तर अतिशय उत्तम उत्पादन मिळते.

आज पर्यंत आपण पारंपरिक पद्धतीने शेती उत्पादने घेत आहोत. विलायती भाज्याच्या शेतीसाठी सुरूवातीचा खर्च अधिक असला तरी उत्पादन चांगले मिळण्यासाठी तो करावा लागतो. या शेती उत्पादनाला चांगला दर मिळतो. देशी भाज्याच्या तुलनेत हा दर दुप्पट ते पाचपट असू शकतो. मागणी लक्षात घेऊन भाज्यांची निवड केली तरी चांगला पैसा मिळवता येतो. अनेकांनी एकाच प्रकारचे उत्पादन न घेता विक्रेत्यांचे मार्गदर्शन घेऊन वेगवेगळ्या भाज्यांची शेती करावी जेणे करून एकाच प्रकारच्या भाजीचे अधिक उत्पादन न होता समतोल राखला जाईल. आज देशातील हॉटेल्समधून चांगल्या प्रतिच्या विलायती भाज्यांची मागणी वाढत आहे. परदेशी निर्यातीलाही खूपच वाव आहे.

भाजीपाल्याच्या पिकांना पाणी देण्याच्या पूर्वापार चालत आलेल्या पद्धती बदलल्या पाहिजेत. लोट पद्धतीने पाणी दिल्यामुळे नंतर पाणी सुकून जमीन घट्ट होते. जमिनीतून येणारे नवीन कोंब सहजपणे बाहेर येत नाहीत तसेच आपण जी खते देतो ती वाहून जातात. त्याऐवजी तुषार सिंचन किंवा ठिबक सिंचन पद्धतीने पाणी द्यावे. त्यामुळे पाण्याचा कमी वापर होतो. मुळांना आवश्यक तेवढेच पाणी मिळते आणि मातीतील आवश्यक घटक वाहून जात नाहीत. जमीन भुसभुशीत राहिल्यामुळे येणारे पीक उत्तम येते. मर्यादित पाण्यामुळे तणही वाढत नाहीत आणि मशागतीचा खर्च कमी होतो.

प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात गांडूळ खतांची निर्मिती करणे जरूरीचे आहे. शेणाचा, पालापाचोळ्याचा वापर करून नैसर्गिक खते तयार करता येतात. शेतात खड्डा तयार करून त्या खड्ड्यातच काडी कचरा टाकून खत निर्मिती करावी. ठिकठिकाणी पडलेल्या कचऱ्यामध्ये बुरशी तयार झाली तर ती पिकाला अपायकारक ठरत असते. ह्या विलायती भाज्या व फळे पूर्वी आपल्याकडे पिकत नव्हत्या. ह्याचे कारण म्हणजे त्याचे उत्पादन करण्याचा प्रयत्न कोणी केला नसेल. परंतु आमचा ठाम विश्वास आहे की कोणतेही नवीन उत्पादन आज विकले जाऊ शकते. सर्व शेतकऱ्यांनी एकाच भाजीपाल्याच्या उत्पादनात न पडता गट शेतीच्या माध्यमातून विविध भाजीपाला उत्पादने वाटून घेऊन त्या प्रमाणे लागवड केली तर चांगला फायदा मिळेल. योग्य उत्पादन, व्यवस्थापन केले तर उत्पन्न निश्चित मिळते.

शेतकऱ्यांनी सध्या करीत असलेल्या उत्पादनांबरोबरच काहीतरी नवीन प्रकारचे उत्पादन करण्याचा प्रयत्न करावयास हवा. ते उत्पादन यशस्वी झाले तर काही नवीन उत्पादन निर्मिती करण्याचा आनंद व योग्य विक्री व्यवस्था केल्यास जास्त फायद्याचे ठरू शकेल. सामान्यतः सर्व शेतकरी परंपरागत शेती उत्पादने घेत असतात व प्रत्येकाचे म्हणणे असते की भाजीपाला एकदाच उत्पादन देऊ शकतो. परंतु अनेक प्रकारचा भाजीपाला वर्षभर उत्पादन देऊ शकतो हे सिद्ध झाले आहे, ज्याच्यामध्ये शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळू शकतात.

नीटपणे अभ्यास करून, विक्री व्यवस्थेचा अंदाज घेऊन जर उत्पादन केले तर विलायती भाज्या आणि फळे ही शेतकऱ्यांसाठी उत्कृष्ट संधी आहे. येणारे दशक शेती उत्पादकांसाठी फायद्याचे ठरणार आहे. शेतीक्षेत्रातही आता नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्याचा अवलंब केला तर मिळणाऱ्या उत्पादनाला खात्रीची बाजारपेठ मिळेल यात शंकाच नाही. आज परत अशी परिस्थिती आहे की तरुण वर्ग सुद्धा कृषीक्षेत्राकडे आकृष्ट होत आहे, कारण त्यांना समजले आहे की योग्य रितीने योग्य पिके घेतली व नवनवीन लागवड केली तर निश्चितच चांगले उत्पन्न मिळू शकते.

आता पुढची कमीत कमी दहा वर्षे शेती उत्पादनाची आहेत. परदेशी व देशी पर्यटकही वाढायला लागले आहेत. खाण्याच्या सवयी बदललेल्या आहेत व नवनवीन खाण्याची आवड वाढली आहे. खरेदी करण्याची म्हणजे क्रयशक्ती मोठ्या प्रमाणावर वाढीस लागली आहे. देशांत व परदेशी सर्व प्रकारच्या कृषी उत्पादनाची मागणी वाढत आहे. कृषीक्षेत्राची आवड असणारे आणि या क्षेत्रात रमणारे युवक असतील तर या क्षेत्रात निश्चितच भवितव्य आहे.

**कालची चूक आणि उद्याची स्वप्नं यांच्यामध्ये आजची संधी आहे!**

## द्राक्ष पीक संरक्षण

द्राक्ष पिकावर या कालावधित उडद्या भुंगेरे आणि पाने व फळ खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होत असतो. या हंगामातील कमी तापमान आणि आर्द्रता त्यांच्यासाठी अनुकूल असते. ही अळी (स्पोडोप्टेरा लिट्यूरा) फळांना छिद्रे पाडून नुकसान करते नंतर या फळांवर फळमाशीचा उपद्रव होऊ शकतो. या अळ्या गोळा करून नष्ट करणे हा एक चांगला उपाय आहे. रासायनिक नियंत्रणासाठी इमामेक्टिन बेंजोएट (५ एसजी) ०.२२ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून सायंकाळी सहा वाजल्या नंतर फवारणी करावी.

उडद्या भुंगेऱ्याच्या नियंत्रणासाठी मातीमध्ये असणाऱ्या या किडीच्या अळी अवस्थेवर नियंत्रणाचे उपाय योजावेत त्यासाठी 'बिव्हेरिया बॅसियाना'+ 'मेटारायझियम ॲनिसोप्ली' प्रत्येकी एक लिटर प्रति २०० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर क्षेत्रात वेलींच्या बुंध्याशी मुळांच्या परिसरात आळवणी करावी. तसेच बागेतील व बांधावरील तण काढून बाग स्वच्छ ठेवावी. या जैविक पद्धतीने नियंत्रण होत नसल्यास इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) १.५ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.

## मोबाईल इतका स्मार्ट कशामुळे झाला?



खूप काही खाल्लं आहे या मोबाइलने...
याने हातातल घड्याळ खाल्लं...
टॉर्च-लाईट खाल्ला...
याने चिठ्ठ्या-पत्रे खाल्ली...
रेडिओ खाल्ला, टेपरेकॉर्ड खाल्ला...
पुस्तके खाल्ली...
कॅमेरा तसेच कॅल्युलेटर खाल्ला...
या मोबाईलने मैत्री खाल्ली...
भेटी-गाठी खाल्ल्या...
नाती-गोती खाल्ली...
वेळ खाल्ला... आरोग्य खाल्लं...
एवढं सर्व खाऊन खाऊन तो स्मार्ट बनला आहे!
जोपर्यंत तो वायरने बांधला होता तोपर्यंत माणूस स्वतंत्र होता.
आता माणूस फोनला बांधला गेलाय...
बोटच निभावतात नाती! भेटायला, बोलायला कोणाला वेळच नाही.
सर्व 'टच' करण्यात बिझी आहेत, परंतु 'टच' मध्ये कोणीच नाही...!

संग्राहक : लिलाधर महाजन,
वरीष्ठ मृदा परिक्षण सहाय्यक, आरसीएफ लि. मुंबई

## विचार मंथन

आपल्यापैकी बऱ्याच जणांना आयुष्य म्हणजे काय? असा प्रश्न पडत असतो. काहीजण म्हणतात जन्मापासून मरे पर्यंतचा कालावधी म्हणजे आयुष्य! तर काही म्हणतात दोन श्वासांमधील अंतर म्हणजे आयुष्य!

मला सुद्धा हा प्रश्न कधी कधी सतावत असतो. खूप विचार करता असे लक्षात आले की जीवन आणि मृत्यु यामधील अनुभवलेला प्रत्येक सुख-दुःखाचा क्षण म्हणजे आयुष्य! जीवन जगत असताना अनेक प्रसंगांतून आपण जात असतो. त्यात काही प्रसंग संघर्षाचे, नैराश्यमय, तर काही आनंदाचे असतात. माणसं जोडली जातात, तोडली किंवा तुटलीही जातात.

माणसाच्या मनाचा थांग लागत नाही असं म्हणतात पण त्यातही माणसाचा प्रामाणिकपणा, खोटारडेपणा, मनातील स्वार्थी हेतु ओळखता येतो. आयुष्य आपणाला पदोपदी काही ना काही शिकवतच असते! आपण स्वतःकडे कर्तेपणा अहंभाव घेऊन जगत असतो म्हणूनच कर्माबाबत मर्यादेपेक्षा अधिक चिंता करतो. आपल्या कर्माचा मुख्य हेतू 'कर्मपुर्तता' असा नसतो तर मनोकल्पित देहबुद्धीनुसार 'अपेक्षापुर्तता' असा असतो, त्यामुळे चिंता आणि त्यातून भीतीचा उगम होतो. संयम ठेऊन सकारात्मक दृष्टीने परिस्थितीकडे पाहिल्यास वाईटातून सुद्धा कधीतरी चांगलं घडताना दिसतं. यासाठी भूतकाळ उगाळत बसण्याऐवजी नवी स्वप्नं बघावीत. जग बदलण्याची अपेक्षा करण्याऐवजी स्वतःला बदलावं.

याबरोबरच मला वाटतं उदरनिर्वाहासाठी पैसा कमवताना चांगले छंद सुद्धा जोपासले पाहिजेत. लहान-सहान आनंद देणाऱ्या गोष्टींमुळे आपले आयुष्य सुंदर बनते. जीवन जगताना माणसंही जोडायला शिकलं पाहीजे... कारण वाईट प्रसंगातून सावरायला, मार्गदर्शन मिळवायला, मन मोकळं करायला, आणि आपल्या भावना जाणणारं कुणीतरी विश्वासू आपल्या जवळचं असावं लागतं.

जीवनात अनेक अडचणी असतात, पण ओठांवर हास्य ठेवा... आयुष्य अनेक क्षणांनी मिळून बनलेलं आहे. माणुसकीची जाणिव, थोडी काळजी, थोडं प्रेम, थोडी मस्ती, थोड्या खोड्या जे असेल ते स्विकारून जगणे हेच तर आयुष्य आहे! कोणत्याही परिस्थितीत जगायचं तर असतंच, मग हसत जगण्यात काय नुकसान आहे..?

- मिलिंद आंगणे
उप व्यवस्थापक (सीआरएम- विपणन)

कृपया सदर अभिप्राय पोस्टाने पाठवा. मजकूर पोस्ट कार्डावर लिहून अथवा स्कॅन करून इ-मेलद्वारेही पाठवू शकता.
(आपल्या शेती पत्रिका सभासद नुतनीकरणासाठी हे आवश्यक आहे.)
आरसीएफ शेती पत्रिका सभासद यादी मोबाईल क्रमांकासह नुतनीकरणाचे काम सुरू आहे. यापूर्वी अभिप्राय पाठविलेल्या सर्व शेतकऱ्यांची नावे सभासद यादीत समाविष्ट केली जाणार आहेत. अभिप्राय प्राप्त न झालेल्या शेतकरी सभासदांची नावे ३१ मार्च २०२० नंतर वगळण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

## आमची शेती पत्रिका– आमचा अभिप्राय !

शेतकऱ्याचे पूर्ण नाव – ..................................

.................................................................

मुक्काम – ..........................................

पोस्ट – ..................तालुका – ...................

जिल्हा – ............................ ☐☐☐☐☐☐

मोबाइल क्रमांक – .................................

इ-मेल आयडी – .....................................

जन्म तारीख – .......................................

वय – .................. शिक्षण – ...................

शेती पत्रिका सभासद क्रमांक –

MH-M ☐ - ☐☐☐☐☐☐

आरसीएफ शेती पत्रिकेबाबतचा आपला अभिप्राय –

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

–: सदर अभिप्राय पाठविण्यासाठीचा आमचा पत्ता :–
सहाय्यक महाव्यवस्थापक (सीआरएम विभाग)
राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड
प्रियदर्शिनी, ८ वा मजला, पूर्व द्रुतगती महामार्ग, सायन, मुंबई–४०००२२
e-mail : crmrcf@gmail.com
दूरध्वनी क्र. ०२२–२५५२३०२२

## Inspiring Thought !

When life gives you
a hundred reasons to cry...
Show life that you have
a thousand reasons to smile!

## मास पंचांग

फेब्रुवारी २०२०, माघ/ फाल्गुन १९४१

| | |
|---|---|
| बुधवार दि. १९.२.२०२० | छत्रपती शिवाजी महाराज जयंती |
| शुक्रवार दि. २१.२.२०२० | संत गाडगेबाबा जयंती |
| बुधवार दि. २६.२.२०२० | स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृतीदिन |
| गुरूवार दि. २७.२.२०२० | मराठी राजभाषा दिन |
| शुक्रवार दि. २८.२.२०२० | राष्ट्रीय विज्ञान दिन |

## हसा चकट फू!

**व्यवस्थापक (एचआर)-** कुठे गेला होता ?
**कर्मचारी-** केस कापायला..
**व्यवस्थापक (एचआर)-** ऑफिस टाइमिंगमध्ये ?
**कर्मचारी-** केस पण ऑफिस टाइमिंगमध्येच वाढलेत..
**व्यवस्थापक (एचआर)-** तुझे केस घरी असताना पण वाढत असतील..
**कर्मचारी-** टक्कल थोडेच केलयं.. जेवढे ऑफिस टाइमिंगमध्ये वाढले होते तेवढेच कापलेत !!

### ग्राफिटी

सुधारणे आणि बिघडणे
व्यक्तीच्या विचारांवर
आणि स्वभावावर अवलंबून असते
परिस्थितीवर नाही!

*ते दिवस खूप छान होते...
घड्याळ एखाद्याकडेच असायचे, आणि वेळ सर्वांकडे, आता घड्याळ सर्वांकडे आहे परंतु वेळ कुणाकडेच नाही!*

*"जो सुख में साथ दे वो रिश्ते होते हैं और जो दु:ख में साथ दे वो फ़रिश्ते होते हैं।"*

शेती पत्रिकेत प्रसिद्ध होत असलेल्या लेखांत जी मते व्यक्त केली आहेत ती संबंधित लेखक–लेखिकांची आहेत. त्या मतांशी व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.
– संपादक, आरसीएफ शेती पत्रिका.

# आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा आविष्कार

## जैविक वृद्धी संवर्धक उद्घाटन सोहळा, जिल्हा-नाशिक













**आरसीएफच्या जैविक वृद्धी संवर्धक (OGS)** या उत्पादनाचा उद्घाटन सोहळा नाशिक क्षेत्रिय कार्यालयातर्फे उत्साहात संपन्न झाला. या उत्पादनाचे उद्घाटन आरसीएफचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. एस. सी. मुडगेरीकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. के. यू. थंकाचन, संचालक (विपणन), श्री. एन. एच. कुरणे, कार्यकारी संचालक (विपणन), श्री. मुकुंद रिसवाडकर, महाव्यवस्थापक (विपणन), श्री. सुनील भावसार, उप महाव्यवस्थापक (विपणन), श्री. नरेंद्र कुमार, सहा. महाव्यवस्थापक (सीआरएम–विपणन), श्री. गणेश वरगंटीवार, व्यवस्थापक (सीआरएम), श्री. प्रसाद आणावकर, व्यवस्थापक व क्षेत्रिय प्रभारी (नाशिक) तसेच धुळे, नंदुरबार, नाशिक व जळगाव जिल्हा प्रभारी, आरसीएफ कृषी अनुसंधान व जैव तंत्रज्ञान विभागाचे अधिकारी, जिल्ह्यातील आरसीएफचे अधिकृत खतविक्रेते आणि प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2009/32806
Date of Publication 1st of every month. Postal Regd. No. MNE/164/2019-21
Posted at Mumbai Patrika Channel on 10th & 11th of every month






हे मासिक मुद्रक व प्रकाशक श्री. नुह हसन कुरणे यांनी मालक राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. मुंबई यांच्यासाठी मे. सॅप प्रिंट सोल्युशन्स प्रा. लि., २८ ए, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. एन. पथ, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – ४०० ०१३. येथे छापून राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. प्रियदर्शिनी, आठवा मजला, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२ येथे प्रकाशित केले.

संपादक : श्री. नुहू हसन कुरणे

RNI NO. MAHMAR/2009/32806

CRM, RCF

यह मासिक मुद्रक एवं प्रकाशक मा. श्री. नुह हसन कुरणे इन्होने राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि. मुंबई, इनके लिए मे. सॅप प्रिंट सोल्युशन्स प्रा. लि., २८ ए, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. एन. पथ, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – ४०० ०१३. यहाँ मुद्रित करके राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि. प्रियदर्शिनी, आठवी मंजिल, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२ यहाँ से प्रकाशित किया।

संपादक : श्री. नुह हसन कुरणे

RNI NO. MAHMAR/2009/32806